# विनियम

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**व्यवस्थापन समिती, शिर्डी - ४२३ १०९**
दिनांक : - **जावक नंबर-३३८६**
**दिनांक-०५/०२/२०२६**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४

क्रमांक :-एसएसएस/वशी-साप्रशा/आस्था/ /२०२५ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४) याचे कलम १५ चे पोटकलम २ सह उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) चे व्यवस्थापन समितीस सेवाप्रवेश विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत. तथापि, सद्यस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे व्यवस्थापन समिती नसून तदर्थ समिती कार्यरत आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ९८/२०२१ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ८७०७/२०२३ दि.०९/०५/२०२४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तदर्थ समिती याद्वारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या अंतर्गत **प्राथमिक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यामधील शिक्षक**, गट - क या पदावरील नियुक्ती करीता पुढील विनियम करीत आहे.

१. (१) या विनियमांना **प्राथमिक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यामधील शिक्षक**, गट-क (सेवाप्रवेश) विनियम, २०२५ असे संबोधण्यात येईल.

(२) ते राज्य शासनाद्वारे संमती दिलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

(३) ते शिक्षकांच्या पुढील शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालये म्हणजेच,- (एक) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, (दोन) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर आणि (तीन) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यामधील शिक्षकांच्या नियुक्तीसंदर्भात लागू असतील.

२. व्याख्या :-

या विनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षीत नसेलतर, -

(क) "अधिनियम" म्हणजे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४. (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४)

(ख) "मुख्य कार्यकारी अधिकारी" म्हणजे अधिनियमातील कलम १३ अन्वये शासनाने नियुक्त केलेले मुख्य कार्यकारी अधिकारी.

(ग) "समिती" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था याची अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटीत करण्यात आलेली व्यवस्थापन समिती.

(घ) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ मुख्य कार्यकारी अधिकारी.

(ङ) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची स्नातक पदवी

(च) "शिक्षण अधिकारी" याचा अर्थ शिर्डी नगरपरिसर क्षेत्रात संस्थानाद्वारे चालविल्या जाणा-या प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या संदर्भात संबंधित जिल्हा परिषद क्षेत्रात चालविल्या जाणा-या जिल्हा परिषदेचा शिक्षण अधिकारी.

(छ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ज) "उच्च माध्यमिक शालांत परिक्षा" म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१) याच्या तरतुदीनूसार घेण्यात आलेली उच्च माध्यमिक शालांत परिक्षा आणि त्यामध्ये शासनाने समकक्ष म्हणून मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही परिक्षेचा अंतर्भाव होतो.

(झ) "विहित परीक्षा" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी याने एकतर स्वतःहून किंवा त्या प्रयोजनार्थ नियुक्त करण्यात आलेल्या एखाद्या अभिकरणाद्वारे घेण्यात आलेली परीक्षा, असा आहे.

(ञ) "शाळा अधिनियम" याचा अर्थ महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७७ (१९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

(ट) "निवड समिती" याचा अर्थ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (सर्व स्थायी कर्मचा-यांना लागू असलेल्या सर्व साधारण तरतुदी) विनियम, २०२५ या विनियमांच्या परिशिष्ट –एक मध्ये नमुद करण्यात आलेली कर्मचारी निवड समिती असा आहे.

(ठ) "शाळा सेवा नियम" याचा अर्थ शासनाने वेळोवेळी शाळा अधिनियमाच्या तरतुदींनुसार केलेले नियम.

(ड) "विश्वस्तव्यवस्था किंवा संस्थान" याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटीत करण्यात आलेली विश्वस्तव्यवस्था, असा आहे.

३. **प्राथमिक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यामधील शिक्षक**, गट - क या पदांवरील नियुक्ती-

प्राथमिक शिक्षक आणि उच्च प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यामधील शिक्षक, गट – क या पदांवरील नियुक्ती संस्थानाद्वारे घेण्यात आलेल्या विहित परीक्षेच्या आधारावर आणि विनियम ४ मध्ये नमुद केलेली शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण करणा-या तसेच शाळा सेवा नियम यामधील तरतुदींनुसार वयोमर्यादा धारण करणा-या व्यक्तींच्या नामनिर्देशनाने केली जाईल.

४. शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता –

नियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदांवर नियुक्ती होण्याकरिता, -

(एक) प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भात – संबंधित व्यक्तींनी, त्या त्या वेळी अंमलात असल्यानुसार शाळा सेवा नियमांच्या अनुसुची- ब च्या परिशिष्ट एक मध्ये नमुद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेली असावी.

(दोन) उच्च प्राथमिक शिक्षकांच्या संदर्भात – संबंधित व्यक्तींनी, त्या त्या वेळी अंमलात असल्यानुसार शाळा सेवा नियमांच्या अनुसुची- ब च्या परिशिष्ट दोन मध्ये नमुद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेली असावी.

(तीन) माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात - संबंधित व्यक्तींनी, त्या त्या वेळी अंमलात असल्यानुसार शाळा सेवा नियमांच्या अनुसुची- ब च्या परिशिष्ट तीन मध्ये नमुद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेली असावी.

(चार) उच्च माध्यमिक शाळा शिक्षक किंवा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक यांच्या संदर्भात - माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात - संबंधित व्यक्तींनी, त्या त्या वेळी अंमलात

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, विधी व न्याय विभाग, मुंबई-४०० ०३२

असल्यानुसार शाळा सेवा नियमांच्या अनुसुची- ब च्या परिशिष्ट चार मध्ये नमुद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण केलेली असावी.

५. इंग्रजी माध्यमातील शाळेकरीता विशेष तरतुदी –

विनियम ४ मधील तरतुदींना अधीन राहुन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल मधील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिक्षक तसेच माध्यमिक शिक्षक यांच्या भरती प्रक्रियेत ज्या उमेदवाराने इंग्रजी माध्यमातून शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यास प्राधान्य देण्यात येईल.

६. विनियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही शाळा अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम तसेच शासनाने वेळोवेळी जारी केलेले आदेश आणि निदेश शिक्षण अधिकारी यांच्या मंजुरीच्या अधिन असेल.

७. परिविक्षाधीन कालावधीः-

विनियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारासाठी त्याच्या नियुक्तीच्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. परिवीक्षा कालावधी हा समितीच्या मान्यतेने कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होणे व प्रशिक्षण पूर्ण करणे (जर असेल तर) अनिवार्य राहिल आणि परिवीक्षा धोरणानुसार हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, परिवीक्षा कालावधीत (वाढीव कालावधीसह) विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास व प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा हा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. सेवेच्या इतर शर्ती लागू असणेः-

संस्थानाद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदी, तसेच शासन निर्णय आणि आदेश आणि संस्थानाद्वारे करण्यात आलेले इतर विनियम, हे, विनियम ३ मध्ये नमुद केलेल्या पदावरील सेवेच्या संदर्भात लागू असतील.

अध्यक्ष, तदर्थ समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

648

# REGULATIONS

**Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi), Shirdi- 423 109.**

Dated the...............2025.

**Outward No.3386**
**Date-05/02/2026**

*Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004.*

No. SSS/WS-GAD/Astha/ /2025 - In exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 15 read with clause (*i*) of section 2 of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004), the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust has the powers to make the regulations regulating the recruitment. However, at present, there is no Management Committee but an Ad-hoc Committee is functioning at Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi. In pursuance of the decision dated 09/05/2024, of the Hon'ble High Court, Bombay, Bench Aurangabad Civil Application No. 8707/2023 in Public Interest Litigation No 98/2021, the Ad-hoc Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust is hereby pleased to make the following regulations regulating the recruitment to the posts of the **Primary Teachers** and **Higher Primary Teachers** and **Secondary Teachers** and **Higher Secondary Schools and Junior College Teachers**, (Group-C) in the Education Department of Shree Sai Baba Sansthan Trust under the said Act, as follows:-

1. (*1*) These regulations may be called the **Primary Teachers** and **Higher Primary Teachers** and **Secondary Teachers** and **Higher Secondary Schools and Junior College Teachers**, (Group-C), in the Education Department (Recruitment) Regulations, 2025.

(*2*) They shall come into force on the date of their sanction by the State Government.

महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग मंत्रालय मुंबई-४०० ०३२

(3) They shall apply in respect of appointment of Techers in the following Schools or, as the case may be, Junior College, viz.

(i) Shree Saibaba English Medium School;

(ii) Shree Saibaba Kanya Vidya Mandir; and

(iii) Shree Saibaba Junior College.

2. In these regulations, unless the context requires otherwise, -

(*a*) "Act" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Mah. XIV of 2004);

(*b*) "Chief Executive Officer" means the Chief Executive Officer appointed by the Government under section 13 of the Act;

(*c*) "Committee" means the Management Committee of the Shree Sai Baba Sansthan Trust formed under section 5 of the Act;

(*d*) "Competent Authority" means the Chief Executive Officer;

(*e*) "Degree" means a Bachelor's degree of a recognised university;

(*f*) "Education Officer" in relation to the Primary and Secondary School maintained by the Trust within the area of the Shirdi Municipal Council, in relation to the Primary and Secondary School established in the area of the Zilla Parishad, the Education Officer of the Zilla Parishad concerned;

(*g*) "Government" means the Government of Maharashtra;

(*h*) "H.S.C." the Higher Secondary Certificate Examination by the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education Act, 1965 ( Mah. XLI of 1965);

(*i*) "prescribed examination" means an examination conducted by the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) either by itself or through any agency nominated by it for the purpose;

(*j*) "Schools Act" means the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service Regulation) Act, 1977 (Mah. III of 1978);

(*k*) "Selection Committee" means the Employee's Selection Committee referred to in the Schedule to in the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) (Recruitment and Classification of Services) Regulations, 2025;

(*l*) "schools service rules" means the rules framed by the State Government from time to time under the Schools Act;

(*m*) "Trust" means the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) established under section 3 of the Act.

3. Appointment to the posts of the **Primary Teachers** and **Higher Primary Teachers**, and **Secondary Teachers** and **Higher Secondary and Junior College Teachers**, (Group-C) in the Trust, shall be made by nomination of a suitable person on the basis of prescribed examination from amongst the persons possessing the Educational Qualifications and professional qualifications specified in regulation 4 and the age criteria as laid down in school service rules.

4. Educational Qualifications.- For being eligible for appointment to the post mentioned in regulation 3, -

(I) In respect of Primary Teachers.- The concerned persons shall possess the Educational and Professional Qualifications, as are set out in Annexure I of the Schedule B to the schools service rules for the time being in force;

(II) In respect of Higher Primary Teachers.- The concerned persons shall possess the Educational and Professional Qualifications, as are set out in Annexure II of the Schedule B to the schools service rules for the time being in force;

(III) in respect of the Secondary Teachers.- the persons shall possess the possess the Educational and Professional Qualifications, as are set

out in Annexure III of the Schedule B to the schools service rules for the time being in force;

(IV) in respect of Higher Secondary Schools/ Junior College Teachers.- the persons shall possess the Educational and Professional Qualifications, as are set out in Annexure IV of the Schedule B to the schools service rules for the time being in force.

5. Special provisions in respect of English Medium School- Subject to the provisions of regulation 4 above, in respect of the appointment as a Primary Teacher and Higher Primary Teacher as also Secondary Teacher of the Shree Sai Baba English Medium School, the candidate shall be given preference, if he has passed the S.S.C. examination in English medium.

6. Confirmation of appointment.- The appointment to the post mentioned in Regulation 3 shall be subject to the Schools Act, the rules made thereunder and orders and directions issued by the State Government and confirmation by the Education Officer.

7. Probation period.-

A person appointed to the post mentioned in regulation 3, by nomination, shall be on a probation for a period of two year from the date on which he joins his post on which he is appointed. The probation period may be extended, after approval of the Committee, for a maximum period upto one year. Completion of the probation period (including extended period) to the satisfaction of the appointing authority; and passing of prescribed examinations and training (if any) shall be mandatory. In the event failing to complete the probation period (including extended period) or pass the examinations and complete the training, his services shall be liable to be terminated.

652

8. Other service conditions to apply.-

The other terms and conditions, specified by the Trust from time to time, as well as the provisions of the Act, the rules made thereunder, the Government Resolutions and orders as well as the provisions of other regulations specified by the Trust shall be applicable in respect of the services to the post mentioned under regulation 3.

Chairman, Ad-hoc Committee,
Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi).